# // प्रेस नोट //

## ➢ सन 2025-26 या वर्षाकरिता फटाका विक्री परवानगीबाबत.

मिरा भाईदर महानगरपालिकेने यंदाचा दिवाळी उत्सव शांततेत, कायदा व सुव्यवस्था राखत साजरा करण्याचे ठरविले आहे. याकरिता मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशान्वये व भारतीय विस्फोटक कायदा 1884 नुसार आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन दिवाळी सणा निमित्त देण्यात येणारे तात्पुरत्या स्वरुपाचे फटाका विक्री परवाने हे सार्वजनिक मैदानात व केवळ खाजगी मोकळ्या जगेत (तात्पुरत्या शेडकरीता) तसेच स्वतंत्र स्वरुपाच्या वाणीज्य दुकानात (निवासी विरहित) देणेबाबत मा. आयुक्त सो, यांनी दि. 10/10/2025 रोजी मंजुरी दिलेली आहे. याकरिता महापालिकेने मिरा भाईदर क्षेत्रात एकुण 30 मैदान / मोकळया जागेची निवड केलेली आहे ती खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | ठिकाण | स्टॉल संख्या | जागेचा प्रकार / मालकी |
|---|---|---|---|
| **भाईदर (प.) येथील महानगरपालिकेची / खाजगी जागा** | | | |
| 1. | क्रॉसगार्डन, भाईदर (प.) | 05 | खाजगी मालकीची जागा |
| 2. | रॉयलगार्डन मेदान, कॉसमॉस बँकसमोर, भाईंदर (प.) | 10 | खाजगी मालकीची जागा |
| 3. | जय महेश नगर, शिवसेना मल्ली, भाईंदर (प.) | 05 | खाजगी मालकीची जागा |
| 4. | सिंघानिया ग्राउंड, महाराणा प्रताप रोड, भाईंदर (प.) | 03 | खाजगी मालकीची जागा |
| 5. | म्हात्रे ग्राउंड, ९० फुटी रोड जागा मोकळी असल्यास | 04 | खाजगी मालकीची जागा |
| 6. | पार्श्व नगर वीणा हॉटेलच्या समोर भाईंदर (प.) | 05 | खाजगी मालकीची जागा |
| 7. | 573/1 मॅक्सेस मॉल जवळ, भाईंदर (प.) | 05 | खाजगी मालकीची जागा |
| 8. | जोशी निकेतन मैदान, भाईंदर (प.) | 05 | खाजगी मालकीची जागा |
| 9. | रावल मैदान, भाईंदर (प.) | 05 | खाजगी मालकीची जागा |
| **भाईदर (पु.) येथील महानगरपालिकेची / खाजगी जागा** | | | |
| 1. | बाळासाहेब ठाकरे मेदान, ईंद्रलोक | 25 | महानगरपालिकेची जागा |
| 2. | नवघर मराठी शाळा मेदान, नवघर | 20 | महानगरपालिकेची जागा |
| 3. | ओस्तवालगार्डन, जेसल पार्क, भाईंदर (पु) | 03 | खाजगी मालकीची जागा |
| 4. | मयेकर ग्राउंड, जेसल पार्क, भाईंदर (पु) | 05 | खाजगी मालकीची जागा |
| 5. | इंद्रलोक नाका, भाईंदर (पु) | 05 | खाजगी मालकीची जागा |
| 6. | साई मंगलम, बी.पी रोड, भाईंदर (पु) | 05 | खाजगी मालकीची जागा |
| 7. | श्याम भवन मैदान, भाईंदर पु. | | खाजगी मालकीची जागा |
| 8. | मिनाताई ठाकरे मार्केट जवळ, भाईंदर (पु.) | | खाजगी मालकीची जागा |
| 9. | प्रकाश अपार्टमेट जवळ मोकळी जागा, नवघर रोड, भाईंदर (पु) | | खाजगी मालकीची जागा |

Scanned with OKEN Scanner

| मिरा रोड (पु.) येथील महानगरपालिकेची / खाजगी जागा | | | |
|---|---|---|---|
| 1. | मच्छी मार्केट, मिरा रोड रेल्वे स्टेशन जवळ | 06 | महानगरपालिकेची जागा |
| 2. | शांती नगर सेक्टरनं २ मैदान | 20 | खाजगी मालकीची जागा |
| 3. | शितलनगर ग्राउंड, गणपती मंदिर जवळ | 10 | खाजगी मालकीची जागा |
| 4. | राजु भोईर मेदान, मिरा रोड (पु) | 02 | खाजगी मालकीची जागा (प्रस्ताव) |
| 5. | शिव ओम टॉवर, मिरा रोड (पु) | 01 | खाजगी मालकीची जागा |
| 6. | रश्मी शॉप नं १, नवरंग हॉटेल जवळ, सिनेमॅक्स जवळ, मिरारोड (पु) | 01 | खाजगी मालकीची जागा |
| 7. | विजय सेल्स जवळ, मिरा भाईंदर हायवे | 01 | खाजगी मालकीची जागा |
| 8. | जांगीड टॉवर सर्कल, एसटीपी प्लॅंट जवळ, मिरा रोड (पु) | 03 पत्र्याचे | खाजगी मालकीची जागा |
| 9. | मिरा गावठान, मिरा रोड (पु) | 03 पत्र्याचे | खाजगी मालकीची जागा |
| 10. | नविन स.क्र. 151, हि. क्र.5, लतीफ पार्क मागे मिरा रोड (पु.) | 03 पत्र्याचे | खाजगी मालकीची जागा |
| 11. | जे पी इफ्रा, मिरा रोड (पु.) | 03 पत्र्याचे | खाजगी मालकीची जागा |
| 12. | हाटकेश, विनय नगर, मिरा रोड (पु.) | | खाजगी मालकीची जागा |

दिवाळी उत्सव कायदा व सुव्यवस्थेच्या चौकटीत राहुन साजरा करणेकरिता व्यवसायधारकांनी महापालिकेस सहकार्य करणेस महापालिकेतर्फे आवाहन करण्यात येत आहे.

दिवाळीचा प्रकाशोत्सव साजरा करताना फटाके फोडण्याच्या वेळी निष्काळजीपणामुळे आग लागणे, स्फोट होणे व जखमी होण्याच्या घटना घडत असतात. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी खालील **अग्निसुरक्षा सूचना व आपत्कालीन मार्गदर्शन** दिले जात आहे.

## फटाके वापरताना नागरिकांनी घ्यावयाच्या खबरदारी:

1. फटाके **नेहमी मोकळ्या जागेत** आणि इमारतींपासून, पार्क केलेल्या वाहनांपासून व ज्वलनशील पदार्थांपासून दूर फोडावेत.
2. **लहान मुलांनी फटाके प्रौढांच्या देखरेखीखालीच** फोडावेत.
3. फटाके फोडताना **सुती कपडे** वापरावेत. नायलॉन वा रेशमी कपडे परिधान करणे टाळावे.
4. फटाका **हातात धरून पेटवू नका**. नेहमी सुरक्षित अंतर ठेवावे.
5. **रॉकेट फटाके बाटलीत ठेवून** फोडावेत जेणेकरून ते वाकडे जाऊन अपघात होणार नाही.
6. **वाजणारे व धूर निघणारे फटाके मर्यादित प्रमाणात** वापरावेत.
7. अर्धवट न पेटलेला फटाका पुन्हा पेटवू नये – तो **पाण्यात टाकून निष्क्रिय** करावा.
8. फटाके फोडताना **पाण्याची बादली / वाळू / अग्निशामक यंत्र (Fire Extinguisher)** जवळ ठेवावी.
9. बंद जागेत, गॅस सिलिंडर जवळ किंवा इंधनाच्या गोदामाजवळ फटाके **पूर्णपणे टाळावेत**.
10. पर्यावरण व प्राणी-पक्ष्यांच्या दृष्टीने **कमी आवाजाचे आणि हिरवे फटाके (Green Crackers)** प्राधान्य द्यावेत.

## फटाक्यांमुळे आग लागल्यास काय करावे?

- घाबरू नका – परिस्थितीचे त्वरित निरीक्षण करा
- जवळच्या व्यक्तींना सावध करा
- विद्युत आग असेल तर पाणी टाकू नका – **$CO_2$ किंवा DCP अग्निशामक** वापरा
- कपड्यांना आग लागल्यास **STOP – DROP – ROLL** पद्धत वापरा
- आग वाढत असेल तर ताबडतोब अग्निशमन विभागाशी संपर्क साधा

Scanned with OKEN Scanner

## फटाका अपघात झाल्यास प्राथमिक उपचार:

- भाजल्यास **थंड पाण्याने धुवा**, मलई/तूप/तेल लावू नका
- गंभीर भाजल्यास **तात्काळ रुग्णालयात** जा
- डोळ्यांत ठिणगी गेल्यास स्वच्छ पाण्याने धुवा आणि **नेत्रतज्ज्ञाचा सल्ला घ्या**

---

## 📞 आपत्कालीन संपर्क क्रमांक

| अ. क्र. | स्थानकांचे नाव | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| 1. | स्व. कल्पना चावला अग्निशमन स्थानक भाईदर (प.) | 9167860018<br>02228197637<br>02228041000<br>02228041001 |
| 2. | सिल्वर पार्क अग्निशमन स्थानक मिरारोड (पूर्व) | 9167860017<br>02228553661 |
| 3. | कनकिया अग्निशमन स्थानक मिरारोड (पूर्व)<br>स्व. कल्पना चावला अग्निशमन स्थानक भाईदर (प.) | 8657949714<br>02228105101<br>9167860018<br>02228197637<br>02228041000<br>02228041001 |
| 4. | उत्तन अग्निशमन स्थानक भाईदर (प.) | 829137021<br>02228452002 |
| 5. | नवघर अग्निशमन स्थानक, भाईदर (पूर्व) | 8657906833<br>02228192829 |
| 6. | पेणकरपाडा अग्निशमन स्थानक, दर्वेश हाईट जवळ, मिरारोड (पूर्व) | 8657906834<br>02220890171 |

दिवाळीच्या सणात मा. उच्च न्यायालय व पोलिस आयुक्तालय, (मिरा भाईदर शहर) यांनी दिलेल्या सुचना नागरिकांनी पाळाव्यात व महापालिकेस सहकार्य करावे. दिवाळी सण साजरा करीत असताना महाराष्ट्र शासनाने दिलेल्या सुचनांचे व मिरा भाईदर पालिकेने ठरविलेल्या नियमांचे तंतोतंत पालन करणे व स्वच्छ भारत अभियान राबविणेस नागरिकांनी महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन मिरा भाईदर महानगरपालिकेचे आयुक्त श्री. राधाबिनोद शर्मा सो. यांनी केले आहे. तसेच दिवाळी सणानिमित्त मिरा भाईदर शहरातील सर्व नागरिकांना व व्यवसायधारकांना महापालिका आयुक्तांकडुन हार्दीक शुभेच्छा.

**(डॉ. सचिन बांगर)**
**उप-आयुक्त**
**अग्निशमन व आणीबाणी सेवा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

Scanned with OKEN Scanner